ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी देण्यात येणारी अनुदाने टप्प्याटप्प्याने कमी करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
शासन निर्णय क्र.ग्रापापु-१००३/प्र.क्र. ४/पापु-०७
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,** दिनांक : ७ फेब्रुवारी , २००३

वाचा -
१) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्र.व्हीपीएम-२०८५/सी.आर.१९४०/२२, दिनांक ९.८.१९८५
२) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु-१००५/सी.आर.१९८०/ पापु-०७ , दिनांक ४.९.१९९६
३) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु-१०९६/प्र.क्र. ११५७/ पापु-०७ , दिनांक ५.९.१९९६
४) शासन निर्णय,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु-१०९९/प्र.क्र.३२८/ पापु-०७ , दिनांक २७.७.२०००

**प्रस्तावना**

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना पुरेसा निधी उपलब्ध व्हावा म्हणून संदर्भीय क्रमांक १ व २ येथील शासन निर्णयान्वये स्वतंत्र व प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांची विज देयके भागविण्यासाठी प्रति हॉर्स पॉवर दराने आकारलेल्या वीज बिलाच्या एकूण खर्चाच्या ५० % रक्कम अनुदान म्हणून जिल्हा परिषदांना देण्यात येत आहे. तर संदर्भीय क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये पिण्याच्या पाण्याच्या शुध्दीकरणासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत वापरण्यात येणा-या टी.सी.एल. पावडरच्या खरेदीवर येणा-या खर्चाच्या ५० % एवढे अनुदान जिल्हा परिषदांना देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे,संदर्भीय क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये केंद्र शासनाच्या वर्धित वेग ग्रामीण पाणी पुरवठा योजनेतंर्गत राज्यास मिळणा-या तरतूदीपैकी १५% तरतूद व राज्य शासनाच्या किमान गरजा कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी करण्यात आलेल्या तरतूदीपैकी १५% तरतूद जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीत जमा करण्यासाठी राखून ठेवून ती जिल्हा परिषदांना देण्यात येत आहे.

२. ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी केंद्र शासनाने एप्रिल १९९९ मध्ये निर्गमित केलेल्या सुधारित मार्गदर्शक सूचना संपूर्ण राज्यासाठी लागू करण्याचा निर्णय संदर्भीय क्र.४ येथील दि. २७ जुलै २००० च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे. त्यानुसार राज्याचा किमान गरजा कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम व केंद्र शासनाच्या वर्धित वेग कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम या सुधारित मार्गदर्शक सुचनानुसार राबविण्यात येत आहे. या सुधारित मार्गदर्शक सूचनानुसार ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्ती यावरील १०० % खर्च संबंधित लाभार्थ्यांनी सोसायचा आहे. त्यामुळे या सुधारित मार्गदर्शक सूचनांनुसार हाती घेण्यात येणा-या योजनांचे व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्ती संबंधित लाभार्थ्यांनी करणे आवश्यक आहे.

३. परंतु, जुन्या योजनांसाठी देखभाल व दुरुस्तीसाठी वरील परिच्छेद १ मध्ये नमूद केल्यानुसार शासन जी अनुदाने देत आहे ती कायम राहीली तर, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे देखभाल व दुरुस्तीसाठी दोन प्रकारच्या पध्द्ती राज्यात राहतील. त्यामुळे ही अनुदाने एकदम नव्हे तर टप्प्याटप्प्याने कमी करुन ती नविन धोरणाच्या पातळीवर आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करुन, शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे:-

(१) ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे व्यवस्थापन , देखभाल व दुरुस्तीसाठी शासनाकडून संदर्भीय क्र. १ ते ४ येथील शासन निर्णयान्वये देण्यात येणा-या अनुदानात सन २००३-२००४ या आर्थिक वर्षापासून दरवर्षी २०% एवढी कपात करुन ही अनुदाने पुढील ५ वर्षात पूर्णपणे बंद करण्यात यावीत.

(२) ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्तीसाठी शासनाकडून देण्यात येणारी ही अनुदाने कमी केल्यामुळे योजनेच्या देखभाल व दुरुस्तीसाठी पुरेसा निधी उपलब्ध व्हावा म्हणून सर्व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी ते सध्या आकारत असलेल्या पाणी पट्टीच्या दरांमध्ये दरवर्षी लगतपूर्वीच्या वर्षातील अनुदान कपातीमुळे स्वंनिधीतून भरावा लागणा-या जादा खर्चासंबंधी तो खर्च भागविता येईल एवढी अथवा २० % यापैकी जे जास्त असेल तेवढी वाढ करावी.

(३) ज्या योजनेचे लाभार्थी वरीलप्रमाणे पाणी पट्टीच्या दरांमध्ये दरवर्षी वाढ करतील अशा योजनांच प्रोत्साहन म्हणून वरील परिच्छेद १ मध्ये नमूद केल्यानुसार कमी कमी केलेले अनुदान तद्नंतरच्या वर्षात उपलब्ध होण्यास पात्र असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(सुधीर ठाकरे)
उप सचिव , महाराष्ट्र शासन

प्रत,

मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,मंत्रालय मुंबई
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी,अधिकारी, जिल्हा परिषद
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबइ (लेखा परिक्षा)
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबइ (लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परिक्षा)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)
सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उपमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, (सर्व)
जिल्हा कोषागार अधिकरी (सर्व)
प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
प्रादेशिक उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, (सर्व)
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (पंचयत) जिल्हा परिषद (सर्व)
उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
गट विकास अधिकारी, पंचायत समिती ( सर्व )
जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, (सर्व)
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालयातील सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७.

A:\२००२ c.r ६ २००३.doc